# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 05 October 2023
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०५ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.

****

- उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांसाठी सिलिंडर अनुदानात शंभर रुपये वाढ करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी;राष्ट्रीय हळद मंडळाच्या स्थापनेची अधिसूचना जारी

- राज्यात दोन शासकीय रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाची राज्य शासनाला नोटीस
- सिक्कीम मध्ये ढगफुटीमुळे भारतीय लष्कराच्या २३ सैनिकांसह ५९ जण बेपत्ता
- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सवाला प्रारंभ

आणि

- आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताला काल १२ पदकं; चारशे मीटर रिलेसह भालाफेक आणि तीरंदाजीतही सुवर्णवेध

****

उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरच्या अनुदानात सरकारनं प्रति सिलिंडर शंभर रुपयांनी वाढ केली आहे. काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले...

***''आज से जो घोषणा हो रही है, उसमें उज्वला के लाभार्थी जो बहनें हैं, उनको दो सौ रूपये के बजाय अब तीन सौ रूपये सबसिडी मिलेगी। करोडो बहनों को एक बार फिर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी की ओर से एक बडी राहत मदत के रूप मे उनको आज का ये निर्णय किया गया है।''***

हळद आणि हळदीच्या उत्पादनांना चालना देण्याच्या उद्देशानं राष्ट्रीय हळद मंडळ स्थापन करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली. हळदीची निर्यात सोळाशे कोटी रुपयांवरून आठ हजार चारशे कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं उद्दीष्ट निर्धारित करण्यात आलं असल्याचं ठाकूर यांनी सांगितलं.

****

राज्यात आवश्यक तिथे हेलिपॅड उभारणी तसंच हवाई-रुग्णवाहिका - एअर अँम्ब्युलन्स सुरु करण्यासाठी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची, नोडल एजन्सी - सुकाणू संस्था म्हणून निवड करण्यात आली आहे. काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. एअर अँम्ब्युलन्स सेवा पुरवणाऱ्या कंपन्याशी समन्वय साधण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

दरम्यान, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या खरीप हंगाम अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांनी काल आढावा घेतला. पीक विमा योजनेतून नुकसान भरपाई देताना, संवेदनशीलपणे आणि सकारात्मक भावनेने मदत करावी, असे निर्देश त्यांनी विमा कंपन्यांना दिले.

****

राज्यातल्या १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल जाहीर केली. यानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे. चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोलापूर आणि अमरावती जिल्हा, सुधीर मुनगंटीवार -वर्धा, राधाकृष्ण विखे-पाटील-अकोला, दिलीप वळसे-पाटील -बुलडाणा, धनंजय मुंडे -बीड, तर संजय बनसोडे हे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम पाहतील.

****

राज्यात दोन शासकीय रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे मृत्यू झाल्याच्या घटनेची, मुंबई उच्च न्यायालयानं स्वतःहून दखल घेत, राज्य शासनाला नोटीस बजावली आहे. सरकारी रुग्णालयांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीचा तपशील आज गुरुवारी सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं, महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ यांना दिले आहेत. रुग्णालयात खाटा, जीवनावश्यक औषधं यांचा तुटवडा असल्याची सबब खपवून घेतली जाणार नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

****

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि नागपूर या रुग्णालयांमध्ये झालेल्या रुग्ण मृत्यू प्रकरणी सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. ते काल नांदेड इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. विधान सभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही काल नांदेड इथं संबंधित रुग्णालयाला भेट देऊन माहिती घेतली. हे मृत्यू म्हणजे सरकारी अनास्थेचे बळी असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

दरम्यान, नांदेडच्या या रुग्णालयाला औषधांचा पुरवठा करण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी वेगवेगळ्या माध्यमातून मदतीचं आवाहन केलं होतं. नांदेड जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पप्पू पाटील कोंढेकर यांच्या पुढाकारातून चार लाख रुपयांची औषधं आणि अन्य सामुग्री रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ एस.आर.वाकोडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. शहर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.विठ्ठल पावडे यांनी परवा सव्वा लाख रुपयांची औषधं रुग्णालयाला दिली होती.

श्री सचखंड गुरुद्वारा बोर्डाने देखील रुग्णालयाच्या मागणीनुसार औषध सामुग्री उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शवली आहे. गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष सरदार डॉ. विजय सतबीरसिंघ यांनी जिल्हा प्रशासनामार्फत रुग्णालयाला याबाबत विचारणा केली आहे.

****

सिक्कीम मध्ये ढगफुटीमुळे भारतीय लष्कराच्या २३ सैनिकांसह ५९ जण बेपत्ता झाले आहेत. काही वाहनंही गाळाखाली दबली गेली असून, या परिसरात शोधमोहिम सुरु असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. लाचेन खोऱ्यात तीस्ता नदीला महापूर येऊन ही दुर्घटना घडली.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक कालपासून मुंबईत सुरू झाली. गव्हर्नर शक्तीकांत दास उद्या शुक्रवारी चलनविषयक धोरण जाहीर करणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. अभिनेता योगेश शिरसाट आणि अभिनेत्री अनुष्का सरकटे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महोत्सवाचं उद्‌घाटन

झालं. या महोत्सवात अडीचशे महाविद्यालयांचे सुमारे तीन हजार विद्यार्थी कलावंत सहभागी झाले आहेत. चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ३६ विविध कलाप्रकारात सादरीकरण होणार आहे.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी क्रीडा स्पर्धेत भारताने काल तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्य पदकं पटकावली. पदकतालिकेत १८ सुवर्ण, ३१ रौप्य आणि ३२ कांस्यपदकांसह एकूण ८१ पदकं जिंकत भारतीय संघ चौथ्या क्रमांकावर कायम आहे. या स्पर्धेत भारताची आतापर्यंतची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. भारताने गेल्या वेळच्या आशियायी स्पर्धेत ७० पदकं पटकावली होती.

***''या स्पर्धेत काल ओजस देवतळे आणि ज्योती सुरेखा वेन्नम जोडीनं तिरंदाजीच्या कपाउंड प्रकारात, नीरज चोपडाने भालाफेक, तर चारशे मीटर रिले स्पर्धेत पुरुष संघानं सुवर्ण पदक पटकावलं. बीडच्या अविनाश साबळेनं पाच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत तर महिलांच्या आठशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरमिलन बैंस हिने रौप्यपदक पटकावलं. या दोघांचंही या स्पर्धेतलं हे दुसरं पदक आहे. भालाफेक प्रकारात किशोर जेना, आणि मुष्टियुद्ध स्पर्धेत लवलीना बोर्गोहेन हिने रौप्यपदक मिळवलं. ३५ किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत रामबाबू आणि मंजूराणीने, मुष्टियुद्ध प्रकारात परवीन हुड्डा हिने, कुस्तीत सुनीलकुमार याने तर स्क्वॉशच्या मिश्र दुहेरीत अनाहत सिंह आणि अभय सिंह जोडीनेही काल कांस्यपदकाला गवसणी घातली.''***

****

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरूवात होत आहे. आज अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी क्रीडा संकुलाच्या मैदानावर, इंग्लंड आणि न्युझीलंडदरम्यान उद्घाटनाचा सामना होणार आहे. याच मैदानावर येत्या १४ तारखेला भारत – पाकिस्तान सामना होईल. दरम्यान भारताचा पहिला सामना येत्या रविवारी आठ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियासोबत चेन्नई इथं एम ए चिदंबरम् मैदानावर होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश कुलकर्णी याची आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. येत्या

२४ ऑक्टोबरपासून बंगळुरू इथं  इन्फोसिस फाउंडेशनच्या इंडिया इंटरनॅशनल चॅलेंज या स्पर्धेत तो सहभागी होत आहे.

****

परभणी जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना आणि राज्य शासन पुरस्कृत घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल, मानवत पंचायत समितीला सर्वोत्कृष्ट पुरस्कार काल प्रदान करण्यात आला. सेलू पंचायत समितीला द्वितीय आणि पालम पंचायत समितीला तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. जिल्हा समन्वय आणि संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा खासदार संजय जाधव यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

****

नियमित वीज पुरवठ्याच्या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी सेनगाव इथं तीन तास रास्ता रोको आंदोलन केलं. वीज वितरण कंपनीच्या वतीनं सहायक उपअभियंता सत्यनारायण वडगावकर यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं.

****

धाराशिव जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून बिबट्याचा वावर आढळला आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांना वडगाव इथं सिद्धेश्वर मंदिराच्या पाठीमागील जंगलात बिबट्या दिसला आहे. बिबट्या आढळल्यास नागरिकांनी तत्काळ गावातील सरपंच, पोलीस पाटील आणि वनविभागाशी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून माघार घेण्याचा प्रवास आजपासून सुरू होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मंगळवारपर्यंत संपूर्ण राज्यातून मोसमी पाऊस परतेल, असा अंदाज आहे.

****